# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# विद्यापीठ परिसर

# “शिवस्पंदन महोत्सव”

# नियमावली

# २०२५—२०२६

डॉ. टी. एम. चौगुले
संचालक
विद्यार्थी विकास

विद्यापीठ परिसर “शिवस्पंदन” महोत्सव विविध स्पर्धा प्रकारांसाठी नियमावली

## ❖ समुहनृत्य :

01) एका अधिविभागाने एकच संघ पाठवावयाचा आहे.
02) या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या जास्तीत जास्त १० व कमीत कमी ६ असावी.
03) समुहनृत्याच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
04) समुहनृत्य किमान ६ मिनिटांचे व कमाल १० मिनिटांचे असावे. जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
05) त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
06) अश्लील व बिभत्स प्रकारे समुहनृत्य सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
07) संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुलामुलींचा असू शकेल.
08) नृत्याचे सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सहभागी संघानेच रंगमंच रिकामा व स्वच्छ करून देणेचा आहे.
09) समुहनृत्यासाठी ५ साथीदार वापरता येतील/रेकॉर्डेट संगीत वापरता येईल.

## ❖ लघु नाटीका :

01) एका अधिविभागाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
02) लघु नाटीका मराठी अथवा हिंदी भाषेत असावी.
03) स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या कमाल सहा आणि किमान तीन राहील.
04) साथीदारांची संख्या जास्तीत जास्त ३ असेल.
05) <u>सादरीकरणासाठी किमान ८ मिनिटे व कमाल १२ मिनिटे वेळ दिला जाईल.</u>
06) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
07) नाटीकेमध्ये राष्ट्रीय व्यक्तींवर वा राष्ट्रीय तत्वांवर टीका तसेच चरित्र/चारित्र्य हनन आणि शारिरीक व्यंगावर टिका अशा बाबींचा समावेश असता कामा नये.
08) स्पर्धकांना रंगभूषा, वेशभूषा, प्रकाष योजना व पार्ष्वसंगीत याचा वापर करता येईल.
09) सादरीकरणासाठी विषय ज्या त्या अधिविभागाने निवडावयाचा आहे. राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती, राष्ट्रप्रेम, अंधश्रध्दा निर्मुलन व सामाजिक समस्या अषा विषयांना प्राधान्य द्यावे.
10) लघुनाटीका ही विनोदी, विडंबनात्मक, उपरोधात्मक असावी. मात्र ती टीकात्मक असू नये.
11) स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची निवड, अभिनय, संरचना, प्रेक्षकावरील परिणाम इ. बाबींवर अवलंबून राहील.

## ❖ मुकनाटय :

मुकनाटय म्हणजे शब्द विरहीत अभिनय, हावभाव, पवित्रा आणि मुद्रा अभिनय यातून अभिव्यक्त करावयाची कला आहे. एखादी कल्पना, विषय मांडणे अथवा गोष्ट सांगणे हे केवळ शारीरिक हालचालीतून त्यात व्यक्त केले जाते. मुकाभिनेत्याला सादरीकरणासाठी कोणत्याही वस्तूची/स्टेज प्रॉपटींचा/स्लोगन बोर्डाचा वापर करता येणार नाही.

01) एका अधिविभागाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
02) मुकनाटय स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या किमान ३ आणि कमाल ६ अषी राहील.
03) साथीदारांची संख्या दोन पेक्षा जास्त असता कामा नये.
04) सादरीकरणासाठी प्रत्येक संघास किमान चार मिनिटांचा व कमाल पाच मिनिटांचा वेळ दिला जाईल.
05) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
06) स्पर्धेचा निकाल सर्वसाधारणपणे विषयाची निवड, सादरीकरणातील संकल्पना, रंगभुषा, पार्ष्वसंगीत व प्रेक्षकांवर परिणाम इ. बाबींवर अवलंबून राहील.
07) संघ मुलांचा, मुलींचा किंवा मुलामुलींचा संमिश्र असू शकेल.

## ❖ भारतीय समूहगीत :

01) एका अधिविभागाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
02) समूहगीत हे भारतीय भाशेमध्ये असावे.
03) या स्पर्धेत तीन साथीदारांचा/ट्रॅकचा वापर करता येईल.
04) साथीदार वगळून संघात कमीत कमी ४ व जास्तीत जास्त ६ स्पर्धक असतील.
05) चित्रपटातील समुहगीतास परवानगी दिली जाणार नाही.
06) संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला—मुलींचा असू शकेल.
07) गायनाचे मुल्य लक्षात घेऊनच निर्णय दिला जाईल. तो वेषभूषा अथवा हावभाव यावर अवलंबून असणार नाही.
08) प्रत्येक संघाने एक समूहगीत सादर करावयाचे आहे.
09) समूहगीतांसाठी एकूण किमान ४ मिनिटे व कमाल ८ मिनिटे वेळ दिला जाईल.
10) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
11) साथीदारांनी गाणं म्हणू नये.

## ❖ एकल लोकवाद्य वादन :

01) एका अधिविभागातून तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
02) लोकवाद्यामध्ये १ साथीदार घेण्यास परवाणगी आहे.फक्त स्पर्धकाचे वादय वाजवू नये.
03) वाद्य लावणेसाठी ३ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
04) सादरीकरणासाठी किमान ४ मिनिटे व कमाल ८ मिनिटे वेळ दिला जाईल.
05) जास्तीत जास्त ३० सेकंद वेळ मान्य करता येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
06) लोकवाद्य हे भारतातील कोणत्याही भागातील चालेल.

## ❖ नकला :

01) एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
02) प्रत्येक स्पर्धकाला किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटे वेळ दिला जाईल.
03) जास्तीत जास्त १५ सेकंदाचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
04) स्पर्धकास विविध आवाजाची व प्रसिध्द व्यक्तीच्या भाषणाची नक्कल करता येईल. यामध्ये चित्रपट सृष्टीतील व्यक्तीमत्वांचाही समावेश राहील.

## ❖ सुगम गायन :

01) एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
02) प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त दोन साथीदार (एक पेटीवादक व एक तबला वादक) बरोबर घेता येईल किंवा ट्रॅक वापरता येईल.
03) प्रत्येक गायकाला किमान ४ मिनिटांचा व कमाल ६ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
04) स्पर्धकास जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
05) या स्पर्धेत भावगीत, भक्तीगीत, भजन, गझल आणि अभंग सादर करता येईल.
06) चित्रपटातील गीतास परवानगी असेल.
07) सुगम गायन कोणत्याही भारतीय भाशेत चालेल.

## ❖ एकल नृत्य :

01) एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
02) प्रत्येक स्पर्धकाला किमान ४ मिनिटांचा व कमाल ६ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
03) स्पर्धकास जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
04) प्राथमिक तयारीसाठी ५ मिनिटाचा वेळ दिला जाईल.
05) अष्लील व बिभत्स प्रकारे नृत्य सादर करणाऱ्या स्पर्धकावर कडक कारवाई करण्यात येईल.
06) कोणत्याही प्रकारचे नृत्य सादर करता येईल. (बॉलीवूड, वेस्टर्ण, लोकनृत्य इ.)

## ❖ रांगोळी :

01) एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
02) प्रत्येक स्पर्धकाला किमान २ तास व कमाल २.३० तासांचा वेळ दिला जाईल.
03) रांगोळीसाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी आणावयाचे आहे.
04) स्पर्धेतील रांगोळीची दृष्य रचना मुक्तहस्त, वर्णनात्मक व हेतु व्यक्त होणारी असावी. (यामध्ये संस्कार भारती प्रकारची रांगोळी असू नये).
05) रांगोळीचा आकार ३ फुट X ३ फुट असावा.
06) बाकीच्या सुचना स्पर्धेच्या वेळी देण्यात येतील.

## ❖ स्थळचित्र :

01) एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
02) संयोजक, स्पर्धकास ज्या ठिकाणी घेऊन जातील त्या ठिकाणी दिलेल्या विषयाप्रमाणे चित्रण करावयाचे आहे.
03) चित्रासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावयाचे आहे. संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.
04) चित्राचा आकार २२” x १५” असेल.
05) प्रत्येक स्पर्धकाला किमान २ तास व कमाल २.३० तासांचा वेळ दिला जाईल
06) चित्रासाठी कोणत्याही प्रकारचे वॉटर कलर, ॲक्रॅलिक कलर इ. रंग वापरता येतील

## ❖ लघुपट (शॉर्टफिल्म) :

01) लघुपट विषय आपल्या आवडीनुसार असावा.
02) वेळ मर्यादा कमीत कमी ३ मिनिटे आणि जास्तीत जास्त ५ मिनिटे असावा.
03) विषय, तांत्रिक बाजु, अभिनय, दिग्दर्शिन, एकुण परिणाम या गोष्टींवर लघुपटाचे मुल्यमापन केले जाईल.
04) देवदैवत—महापुरुष यांचा आपल्या कलाकृतीमधुन अवमान होणार नाही याची काळजी घेणे.
05) लघुपट नवनिर्मिती असावी.
06) लघुपटाचे सर्व अधिकार संयोजन समिती / विद्यार्थी विकास विभागाकडे असेल.
07) लघुपट सबमिट करताना A४ साईज PDF वर तुमच्या लघुपट निर्मितीच्या प्रवासातील काही फोटो देणे. (एकाच पेज वर देणे)
08) रजिस्ट्रेशन वेळी लघुपट सबमिट करणे व त्याला कॉलेज कोड क्रमांकाने रिनेम करणे.
09) लघुपट मध्ये तुमच्या विभागाचे नाव, इमारतीचे नाव येता कामा नये.

## ❖ शोभायात्रा (रॅली) :

01) उद्घाटन समारंभाच्या दिवशी सर्व अधिविभागातील विद्यार्थ्यांची शोभायात्रा आयोजित केली जाईल.
02) सहभागी होण्यासाठी विद्यार्थी संख्या मर्यादीत नाही.
03) सहभागी अधिविभागाने शोभायात्रेमध्ये राष्ट्रीय/सामाजिक महत्त्व या विषयावर किंवा सांस्कृतिक परंपरा यांचे सादरीकरण करावे.
04) मूल्यांकन थीम, पोशाख, सादरीकरण, एकूण परिणाम इत्यादींवर आधारित असेल.